**नि.क्र. ०९**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची साक्ष –**
**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : जॉन्सन जॉन फर्नांडीस
वय सुमारे : २७ वर्षे, धंदा –नोकरी
राहणार : गणेश नगर, रानबांबुळी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

---

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्रीम.एस. व्ही. गोबाडे यांचे मार्फत –**

**०१.** मयत सेलिना जॉन फर्नांडीस ही माझी सख्खी बहीण होती. आरोपी जोसेफ हा माझा पाहुणा आहे. घटना दिनांक ०१/०६/२०२५ रोजी रात्री ८.०० च्या सुमारास पुष्पसेन कॉलेजच्या समोर, आयशर शोरुम व राणे बसस्टॉपजवळ घडली. त्यावेळी माझी बहिण सेलिना कुडाळला जाणेसाठी घरातून निघाली. माझे काम हाते म्हणून मी देखील तिच्या पाठीमागून माझे कारने निघालो. काही वेळाने मी घटनेच्या ठिकाणी पोहोचलो असता तेथे मला गर्दी दिसली, तेथे माझी बहिण व आरोपी रस्त्याच्या बाजुला पडलेले दिसले. माझे बहीणीच्या डोक्याला रक्त आले होते. मी तिला उचलले व माझे कारने तिला सिव्हील हॉस्पीटल, ओरोस येथे घेवून आलो. माझी बहिण आरोपी जोसेफच्या पल्सर गाडी क्र.एम.एच.–०७/अेपी–८६५८ या गाडीने जात होती व ती गाडी आरोपी चालवित होता.

**०२.** सिव्हील हॉस्पीटल, ओरोस येथे माझे बहिणीवर पुढील उपचार झाले नाहीत, ती जवळपास कोमात होती. तेथे माझे बहिणीला व्हेंटीलेटर लावून पुढील उपचाराकरीता गोवा, बांबुळी येथे रेफर केले त्यानुसार मी तिला तेथे घेवून गेलो. तिला तेथे व्हेंटीलेटरवर ठेवले व दुस–या दिवशी सकाळी ८.०० वाजता मृत घोषीत केले. मी त्याच दिवशी म्हणजे दिनांक ०२/०६/२०२५ रोजी पोलीसात तक्रार दिली. सदरचा अपघात आरोपी जोसेफच्या चुकीमुळे झाल्याचे मला समजले. आता मला मी पोलीसांना दिलेली फिर्याद दाखविली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. आता मला त्याबाबतची छापील एफ.आय.आर. दाखविली. त्यावर माझी

सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर दोन्ही दस्तांना **अनुक्रमे नि.पी–१/पीडब्ल्यु–१ व पी–२/पीडब्ल्यु–१** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.पी. एम. मुजावर यांचे मार्फत</u> –**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, माझी बहिण घरातून निघाल्यानंतर मी पाच ते दहा मिनिटांनी कुडाळला जाणेसाठी निघालो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर ब–यापैकी खडडे पडलेले होते व ते खडडे मोठे होते. घटनास्थळावर पाच ते सहा व्यक्ती जमा झालेले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात होताना प्रत्यक्ष पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे तो अपघात कशामुळे घडला, कोणाच्या चुकीमुळे घडला हे मी खात्रीपुर्वक सांगू शकत नाही.

**०४** हे म्हणणे खरे आहे की, माझे बहिणीचे आरोपीसोबत लग्न ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे बहिणीचा अपघात झाल्याचे व तो अपघात आरोपीच्या चुकीमुळे झाल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी एफ.आय.आर. तयार केला व त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>फेरतपास</u>** – नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.01.20 16:00:03 +0530

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.

ठिकाण :– ओरोस
दिनांक :–२०/०१/२०२६.